CMYK

बीड । मंगळवार

२९.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : २९


किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# आपल्याच लोकांनी विश्वासघात केला!

## पहलगाम हल्ल्यात 15 काश्मिरींची ओळख पटली

**वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आता एनआयएने तपास सुरू केला आहे. दरम्यान, रोज नवीन खुलासे होत आहेत. पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानी हल्लेखोरांना काश्मीरी नागरिकांनी मदत केल्याचा संशय आहे. १५ स्थानिक काश्मिरी ओव्हरग्राउंड कामगारांची ओळख पटली आहे. तीन मुख्य संशयितांना अटक, दोघांचा शोध सुरू

साहित्याची व्यवस्था करण्याव्यतिरिक्त, पाकिस्तानकडून शस्त्रास्त्रांचा साठा देखील मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. तपास एजन्सींनी पाच प्रमुख संशयितांवर केंद्रित आहे, त्यापैकी तिघांना अटक केली आहे. पोलिस आणखी दोघांचा शोध घेत आहेत. पहलगाम हल्ल्याच्या काही दिवस आधी हे पाचही जण त्या परिसरात फिरत होते. या सगळ्यांचे फोन त्या परिसरात सक्रिय होते. इलेक्ट्रॉनिक पाळत ठेवल्याने एक चॅटींग समोर आले आहे. या चॅटमध्ये ताब्यात घेतलेले तीन प्रमुख संशयित पहलगाममधील पाकिस्तानी दहशतवाद्यांबद्दल आणि त्यांना कशी मदत करावी याबद्दल एकमेकांशी बोलत होते. २०० हून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले


दहशतवाद्यांना मदत केल्याचा संशय

दरम्यान, हल्ल्याशी संबंध शोधण्यासाठी २०० हून अधिक कामगारांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. हल्लेखोर अजूनही पहलगामच्या घनदाट जंगलात लपून बसले असतील असा संशय आहे. पहलगाम हल्ल्यात पाचही जणांच्या भूमिकेबद्दल पुरेसे पुरावे असल्याची माहिती समोर आली आहे.

एनआयए, जम्मू आणि काश्मीर पोलिस, इंटेलिजेंस ब्युरो आणि रॉ यांच्या तपासकर्त्यांचा समावेश असलेल्या संयुक्त चौकशी पथकाकडून इतर १० ओजीडब्ल्यूंची चौकशी केली जात आहे. कारण त्यांनी पूर्वी काश्मीरमध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांना मदत केली होती. २२ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्याच्या ठिकाणी ते होते..

१५ स्थानिक दहशतवादी सहकारी दक्षिण काश्मीरमधील आहेत. मागील काही वर्षांत दक्षिण काश्मीरमध्ये झालेल्या अनेक हल्ल्यांमध्ये सहभागी असलेल्या पाकिस्तानी दहशतवाद्यांना त्यांनी मदत केल्याचा संशय आहे.

या दहशतवादी सहकाऱ्यांनी पाकिस्तानी दहशतवाद्यांना साहित्य पुरवण्यास मदत केली, दहशतवाद्यांना जंगलात माहिती दिली आणि दहशतवादी हल्ल्यांमध्ये वापरण्यासाठी पाकिस्तानकडून शस्त्र मिळवली.

ताब्यात घेतलेल्या ओव्हरग्राउंड कामगारांची चौकशी सुरू- पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना साहित्य पुरवण्यासह जंगलातील माहिती दिली. याबाबत आता कामगारांची चौकशी सुरू आहे. अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अशी, आम्ही १५ जणांना ताब्यात घेतलेल्या जत्रथ्थ कडून अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करत आहोत.

# पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात...!

## लवकरच वाहतुकीसाठी पुल खुला होणार: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल मधील पिंपळवाडी ते भाळवणी रस्त्यावर बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सामान्य जनतेला वाहतुकीसाठी हा पुल पुढील काही दिवसात खुला होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी दिली आहे.





पिंपळवाडी, भाळवणी डोंगरी पट्ट्याचा परिसर या परिसरातील शेतकरी शेतीसह दूध, दही, भाजीपाला शेती पुरक व्यवसाय करतात. रोज बीड शहरात दुध दही विकण्यासाठी येतात.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कामाची गती

## विमानतळाच्या स्थळ पाहणीसह सीएससी सेंटरला अचानक भेट

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात नुकतेच पदभार स्वीकारलेले जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कामाचा झपाटा सुरूच ठेवला आहे. रविवारची सुट्टी असूनही त्यांनी सकाळी १० वाजेपासून अधिकाऱ्यांच्या ताफ्यासह विविध ठिकाणी थेट भेटी देत कामाचा आढावा घेतला.

नियोजित विमानतळाची पाहणी, तसेच कामखेडा, वासनवाडी आणि जिरेवाडी येथील सीएससी सेंटरला भेट देत



शासकीय सेवा व योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. जॉन्सन यांनी आयटीआय येथील प्रस्तावित तारांगण, इनोवेशन सेंटरला भेट दिली. त्यानंतर कामखेड्यातील प्रस्तावित विमानतळाच्या जागेची पाहणी करत आराखड्याचा आढावा घेतला. या विमानतळाच्या प्रकल्पासंदर्भात स्थानिक प्रशासनासमवेत पुढील योजना ठरविण्यात आल्या आहेत. त्यानंतर वासनवाडी ॲग्रोस्टेक संदर्भात ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामस्थ तसेच अधिकाऱ्यांशी चर्चा केली. जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या पथकाने कामखेडा, जिरेवाडी, वासनवाडी

▶▶ उर्वरित पान २ वर

## वांगी येथील विविध विकास काम न करताच सरपंच व ग्राम सेवकांनी संगन मतांनी पाच लाख रुपये खाल्ले: हरिभाऊ शेळके





**या भ्रष्टाचाराची जिल्हाधिकारी साहेबांनी चौकशी करून भ्रष्ट ग्रामसेवकाला सस्पेंड नाही केल्यास गावकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून उपोषणाला बसणार असल्याचे शेळके यांनी म्हटले आहे.**

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच असलेल्या वांगी ग्रामपंचायत अंतर्गत विविध कामांमध्ये भ्रष्टाचार करून ग्रामसेवक व सरपंच यांनी लाखो रुपये कामे न करताच बील उचलूली . वांगी ग्रामपंचायत अंतर्गत गेल्या काही महिन्यात विविध विकास कामाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैशाची लूट करण्यात आली या सर्व कामाची माहिती ग्रामसेवकाला विचारले असता ते माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याने आज सकाळी हरिभाऊ शेळके व गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकले आहे हरिभाऊ रावण शेळके यांनी ग्रामपंचायत वांगी अंतर्गत कामाच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली होती. घनकचरा पाणीपुरवठा योजना वित्त आयोग यासह जी काही कामे झालेली आहेत त्याची माहिती देण्याबाबत अर्ज ▶▶ उर्वरित पान २ वर

## वैद्यनाथ बँक गैरव्यवहार प्रकरण: पोलिसांचा ‘क’ समरी अहवाल फेटाळला, परळी न्यायालयाचा पुढील तपासाचा आदेश

**परळी । प्रतिनिधी**

येथील वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील २०११ ते २०१६ या कालावधीत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहार आणि अनियमिततेच्या प्रकरणात परळी शहर पोलिसांनी दाखल केलेला ’क’ समरी (प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा) अहवाल परळी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने (एस. बी. गणापा) फेटाळून लावला आहे. न्यायालयाने २८ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आदेशात पोलिसांना या प्रकरणात पुढील तपास करून लवकरात लवकर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. बँकेचे सभासद सुभाष निर्मळ यांनी दाखल



केलेल्या प्रोटेस्ट याचिकेवर हा निर्णय देण्यात आला.

**काय आहे प्रकरण?**

बँकेचे सभासद सुभाष निर्मळ यांनी २०१७ मध्ये परळी न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६ (३) अंतर्गत अर्ज दाखल केला होता. यामध्ये त्यांनी वैद्यनाथ बँकेचे २०११-१६ काळातील तत्कालीन चेअरमन, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखापरीक्षक, विधी सल्लागार आणि मूल्यांकनकार अशा एकूण २६ जणांवर बँकेच्या व्यवहारात अनियमितता आणि कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप केला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर परळी शहर पोलीस ठाण्यात २६ जणांविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या विविध

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पदवीधर शिक्षकांचे धरणे आंदोलन



**बीड । प्रतिनिधी**

पदवीधर शिक्षकांनी बदल्याच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज (दि.२८) सोमवार रोजी धरणे आंदोलन केले आहे. या धरणे आंदोलनामध्ये अनेक पदवीधर शिक्षकांची उपस्थिती होती. बीड जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असलेल्या भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन परिपत्रक ३ ऑक्टोंबर २०१६व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दि. २४ मार्च २०२३ मधील २ टिप (१ क) नुसार सेवा अंतर्गत मान्यता प्राप्त मुक्त विद्यापीठातून बीएससी पदवी प्राप्त केली असल्याने विषय रूपांतर करून गणित विज्ञान विषय संवर्धात प्राथमिक शिक्षक पदवीधर म्हणून समावेश करण्याची मागणी लेखी पत्राद्वारे जिल्हा परिषद

▶▶ उर्वरित पान २ वर

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आतंकवाद्यांचा बदला घेतल्याशिवाय रहाणार नाहीत : युवा नेते अक्षय मुंदडा यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

काश्मिरच्या पहेलगाममध्ये भारतीय पर्यटकांच्यावर अतिरेक्यांनी हल्ला करून २८ लोकांचे प्राण घेतले त्या घटनेचा निषेध करण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या वतीने अक्षय बंगल्यावर कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली होती. त्यावेळी बोलताना भाजपाचे



युवा नेते अक्षय मुंदडा म्हणाले की, अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्यानंतर संपुर्ण देशात संतापाची लाट उसळली असुन जनतेचा देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यावर विश्वास असल्याने याचा बदला घेतल्याशिवाय ते स्वस्थ बसणार नाहीत. बैठकीच्या प्रारंभीच अतिरेक्याच्या हल्यात मृत्यु ▶▶ उर्वरित पान २ वर



# भाजपाने तुम्हाला सन्मान दिला, तुम्ही आता पक्षाचे संघटनात्मक काम वाढवा : भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी यांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघातील मंडळ प्रमुखाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा सन्मान करण्यासाठी 'अक्षय' निवासस्थानी तातडीची बैठक बोलाविण्यात आली. ज्यामध्ये पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची उपस्थिती होती. या बैठकीत बोलताना प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने सन्मानाचं पद देवून विश्वास टाकल्यानंतर शहरात आणि तालुक्यात संघटनात्मक कामात कठोर परिश्रम घेतले तर नेतृत्व बळकट होते. त्याचबरोबर संघटना देखील मजबूत होवू शकते. नविन पदाधिकार्यांनी काम करताना आपल्या लोकनेत्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे आणि या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना केंद्र आणि राज्य सरकारने हाती घेतलेल्या विकास योजना



तळागाळापर्यंत पोहोचविण्याची आपली जबाबदारी निश्चितच असते. मंडळाच्या माध्यमातून मिळालेली जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्षमपणे पार पाडली तर खर्या अर्थाने तळागाळापर्यंत आपला विचार निश्चित पोहोचल्याशिवाय रहाणार नाही असे त्यांनी सांगितले. या मतदारसंघातील मंडळाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर 'अक्षय' निवासस्थानी आमदारांच्या वतीने नुतन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेवून त्यांचा सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहर मंडळाच्या अध्यक्षपदी – संजय गंभीरे, अंबाजोगाई पश्चिम मंडळाच्या अध्यक्षपदी – गोकुळ कदम, तर केज पुर्व मंडळ अध्यक्षपदी – भगवान केदार, केज पश्चिम – संदिप पाटील, बालाघाट बीड – राणा डोईफोडे, नेकनूर – अशोक रसाळ आदींच्या निवडी जाहिर झाल्या. यापैकी काही मंडळ अध्यक्ष उपस्थित झाल्यानंतर त्यांचा जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांनी शाल, श्रीफळ, फेटा बांधुन सन्मान केला. बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले की, आपण राज्यात नव्हे तर देशात सर्वात मोठ्या सदस्य संख्या असलेल्या पक्षाचे कार्यकर्ते असुन राज्यात दिड कोटी आपली सदस्य झाले ज्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात नेत्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई, माजी खासदार डॉ. प्रितमताई आणि आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली काम करताना सदस्य नोंदणीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संघटनेत मिळालेली पदं खर्या अर्थाने चांगलं काम करण्यासाठी संधी असते. भाजपाचे संस्कार आणि विचार हा खर्या अर्थाने सामान्य जनतेमध्ये आपणच घेवुन जावु शकतो. ज्यांना पदं मिळाली त्यांनी आपल्यावर आलेली जबाबदारी आणि कर्तव्य भावनेतून निश्चित चांगले काम करायला हवे. मंडळ अध्यक्ष या नात्याने सर्वांना सोबत घेवुन काम तर करणे महत्वाचेच त्याहुन अधिक भाजपाचा अध्यक्ष हा जो सामान्य जनतेतला विश्वास तो टिकवण्यासाठी सर्वांग चौकटीत राहुनच काम करणे महत्वाचे. बीड जिल्ह्यात आपल्या नेतृत्वाने मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली.

केज विधानसभा मतदारसंघात देखील आमदारांनी प्रचंड विकासनिधी आणला. खर्या अर्थाने जनतेपर्यंत घेवून गेलं पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे हे आपलंच काम असून नविन पदाधिकार्यांनी क्रियामान, क्रियाशीलता वाढवुन निष्ठेने काम केले तर आपलं नेतृत्व आणि संघटना बळकट झाल्याशिवाय रहात नाही हा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी केज बाजार समितीचे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, हिंदुलाल काकडे, ॲड.शरद इंगळे, महादू मस्के, पंडितराव जोगदंड, शंकर उबाळे, ॲड.शरदराव इंगळे, राणा चव्हाण, आण्णा सोनवणे, अनंत आरसुडे, सुभाष घुंडरे, बाबासाहेब शेळके, प्रशांत आदनाक, शिरीष मुकडे, गणेश रूद्राक्ष, सुनिल मस्के, गौरव लामतुरे, सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, महेश आंबड, माऊली वैद्य, विकास जाधव, शैलेष स्वामी, संतोष जिरे, दिपक कोरडे, सुनिल आडसुळ, संतोष शिनगारे, अभय केंद्रे, सोपान मोरे, योगेश कडबाने, दिपक सुरवसे, विलास काजगुंडे, राहुल कापसे, मयुर रणखांब, निकेश जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडींचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

पान १ वरून पुढे...

## पिंपळवाडी बिंदुसरा...

डोक्याचावाडा साठवण तलावाखाली बिंदुसरा नदीचे पात्र रुंद असल्यामुळे पावसाळ्यात शाळेतील मुले, दुग्ध व्यवसायीक शेतकरी, सर्वसामान्य माणूस यांना रहदारीला अडचण होते. पुरसदृश्य परिस्थितीत पिंपळवाडी व परिसरातील गाव खेड्यांचा पुला अभावी संपर्क तुटतो.यामुळे जनतेचे हाल होतात. पुला अभावी पावसाळ्यात होणारी अडचण लक्षात घेऊन,अनेक वर्षापासून या पुलाची मागणी ग्रामस्थ करत होते. लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र मस्के यांच्याकडे डोंगरपट्ट्यातील नागरिकांनी पुलाची मागणी केली होती. डोंगरपट्ट्यातील गाव खेड्यांना जोडणारा हा महत्वपूर्ण पुल मंजूर करण्यासाठी शासन प्रशासन स्तरावर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा पुल मंजूर करून घेतला. प्रलंबित विकास कामाला गती मिळाली.या पुलामुळे भविष्यात वाहतूकी साठी अडचण निर्माण होणार नाही.

या पुलाचे काम आज अंतिम टप्प्यात असून येणाऱ्या काही दिवसात आठ ते दहा गावांना सुलभतेने जोडणारा हा पूल जनतेसाठी खुला होणार आहे. आगामी काळात या भागातील विकास कामांना प्राधान्य देवून जनतेचे हित साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहाणार आहोत.असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी दिला आहे.

## बीड जिल्ह्यात...

येथील सीएससी सेंटरला भेट दिली.

यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी कृषी संबंधित ऑनलाईन कामे, फार्मर आयडी तयार करण्याची प्रक्रीया आणि अन्य सर्व सामान्यांची सुविधा कशी वाढविता येईल, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली.

## वांगी येथील...

दाखल केलेला आहे मात्र गावचे ग्रामसेवक माहिती देण्यास

पान १ वरून पुढे...

टाळाटाळ करत असल्याने आज हरिभाऊ शेळके व वांगीतील नागरिकांनी ग्राम पंचायत कार्यालयाला कुलूप ठोकले आहे. ग्रामसेवकाला वेळोवेळी माहिती मागवली मात्र ग्रामसेवकांनी हरिभाऊ शेळके यांना धमक्या दिल्या मी कोण आहे मला ओळखत नाहीस मी तुला माहिती देत नाही आमचे काय वाकडे करायचे ते करून घे अशा प्रकारची धमकी देखील ग्राम सेवकांनी व सरपंचांनी दिली. असल्याचे हरिभाऊ शेळके यांनी पत्रकात म्हटले आहे.

## वैद्यनाथ बँक...

कलमांखाली (४२०, ४०६, ४०८, ४०९, ४१८, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४) गुन्हा नोंद (गु.र.न. १२२/२०१७) करण्यात आला होता.

पोलिसांचा तपास आणि 'क' समरी अहवाल

पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करून न्यायालयात 'क' समरी अहवाल सादर केला, ज्याद्वारे खटला चालवण्याइतपत पुरावे नसल्याचे सूचित करत प्रकरण बंद करण्याची शिफारस केली होती. या अहवालाविरोधात मूळ तक्रारदार सुभाष निर्मळ यांनी न्यायालयात प्रोटेस्ट (हरकत) याचिका दाखल केली.

न्यायालयाने अहवाल का फेटाळला?

न्यायालयाने आपल्या आदेशात पोलीस तपासावर गंभीर ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की:

१. तपास अपूर्ण: पोलिसांनी केलेला तपास योग्य आणि पूर्ण नाही. अनेक गंभीर आरोपांची सखोल चौकशी झालेली नाही.

२. आरोपींच्या माहितीवर विसंबून तपास अधिकाऱ्यांनी स्वतः बकेतील कागदपत्रांची पडताळणी किंवा जप्ती न करता, ज्यांच्यावर आरोप आहेत त्याच व्यक्तींनी (बँक अधिकारी) दिलेल्या माहितीवर आणि जिल्हा उपनिबंधकांनी दिलेल्या अहवालावर जास्त विश्वास ठेवला.

३. विसंगत अहवालाकडे दुर्लक्ष: सहकार खात्याच्या विशेष लेखापरीक्षकांनी (श्री. डी. एस. चव्हाण) दिलेल्या आणि जिल्हा उपनिबंधकांच्या अहवालाशी विसंगत असलेल्या तपासणी अहवालाचा

पान १ वरून पुढे...

विचार तपास अधिकाऱ्यांनी केला नाही.

४. विशिष्ट आरोपांची चौकशी नाही: सोमनाथ साखरे यांनी भरलेले ३ कोटी रुपये कर्ज खात्यात जमा न होणे, नोटाबंदीच्या काळात १० कोटी रुपये जप्त होणे (गु.र.न. ३८/२०१६, मुंबई), विशाल बुधवंत यांच्या नावे बोगस कर्ज उचलणे अशा अनेक गंभीर आरोपांबाबत पोलिसांनी स्वतंत्र आणि सखोल तपास केला नाही. ५. सार्वजनिक पैशाचा प्रश्न : हे प्रकरण सार्वजनिक पैशाच्या गैरव्यवहाराशी संबंधित असल्याने याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे.

प्रमुख आरोप काय होते?

तक्रारदार आणि न्यायालयाच्या निरीक्षणात आलेल्या प्रमुख आरोपांमध्ये बनावट कर्ज प्रकरणे तयार करणे, कर्जाची रक्कम लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवता मध्येच हडप करणे, कर्ज नसताना वसुली प्रक्रिया सुरू करणे, नोटाबंदीच्या काळात मोठ्या प्रमाणात रोकड बाळगणे, पात्र नसलेल्या संस्थांना कर्ज देणे, गहाण मालमत्तेचे अवाजवी मूल्यांकन करणे, नातेवाईकांच्या मालमत्तांना झुकते माप देऊन भाडे करार करणे, शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलाची रक्कम अडवून ठेवणे, एकरकमी कर्ज परतफेड योजनेत (जढड) अनियमितता करणे आणि बँकेच्या वाहनांचा खाजगी कामासाठी वापर करणे अशा अनेक बाबींचा समावेश आहे.

पुढे काय?

न्यायालयाने 'क' समरी अहवाल फेटाळून लावल्यामुळे आता परळी शहर पोलिसांना या प्रकरणाचा पुन्हा आणि अधिक सखोल तपास करावा लागणार आहे. न्यायालयाने लवकरात लवकर पुढील तपास करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून चर्चे असलेल्या वैद्यनाथ बँकेतील कथित गैरव्यवहार प्रकरणाला पुन्हा एकदा वाचा फुटली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर...

प्रशासनाकडे करण्यात आलेली आहे मात्र याबाबत कोणतीही ठोस भुमिका घेतली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी विकास गवते, दिलीप सानप, जितेंद्र सांगळे,

पान १ वरून पुढे...

चव्हाण निलेश, सानप ए.एन, श्री.वाहळ, श्री.कोकाटे, श्री. खाकरे, श्री. घोडके, श्री. आळणे सह आदींचा सहभाग होता.

## पंतप्रधान नरेंद्र...

पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, भाजपाचे प्रवक्ते राम कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. बैठकीत बोलताना अक्षय मुंदडा म्हणाले की, पहेलगाममध्ये अतिरेक्यांनी पर्यटकांवर बेछुट गोळीबार करून हल्ला केला ज्यामध्ये देशातील २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. २०१४ नंतर या देशात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी नेतृत्व उदयास आले. सबका साथ –सबका विकास या उक्तीतुन काम करताना सर्व समाजाला सोबत घेवुन विकास काय असतो ?हे त्यांनी दाखवुन दिले.आपला देश जगाच्या पाठीवर सर्व शक्तिमान ही ओळख देखील त्यांनी करून ठेवली. अधुनमधुन शत्रु अशा क्रुर घटना करत डोके वर काढत असले तरी आम्ही काय करू शकतो हे मोदीजींनी सर्जिकल स्ट्राईकच्या माध्यमातुन पुर्वीच दाखवुन दिलेले आहे. कालचा हल्ला भ्याड आणि दुर्दैवी असुन आम्ही सर्व भारतीय ज्या पर्यटकांचे बळी गेले, त्या कुटुंबियांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा असुन घटनेचा निषेध देखील त्यांनी केला. अतिरेक्यांनी हल्ला केला मात्र त्यांचे पाळंमुळे शोधुन कुठल्याही परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी बदला घेतल्याशिवाय रहाणार नाहीत या शब्दांत त्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. यावेळी जेष्ठ कार्यकर्ते हिंदुलालजी काकडे, महादेव मस्के, पंडितराव जोगदंड, शंकर उबाळे, डॉ.वासुदेव नेहरकर, भगवानराव केदार, संजय गंभीरे, ॲड.शरदराव इंगळे, विलास आण्णा सोनवणे, अनंत आरसुडे, सुभाष घुंडरे, बाबा शेळके, प्रशांत आदनाक, गणेश रूद्राक्ष, सुनिल मस्के, गौरव लामतुरे, सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, महेश आंबड, माऊली वैद्य, विकास जाधव, शैलेष स्वामी, संतोष जिरे, दिपक कोरडे, सुनिल आडसुळ, संतोष शिनगारे, अभय केंद्रे, शिरीष मुकडे, सोपान मोरे, दिपक सुरवसे, विलास काजगुंडे, राहुल कापसे, मयुर रणखांब, निकेश जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी कार्यकर्त्यांनी भारतमाता की जय म्हणत घोषणा दिल्या.

पान ४ वरून पुढे...

## प्रधानमंत्री आवास...

शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे– सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस– २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले–स्टोअरवरून आपल्या म ोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

## आंबेडकरांनी संविधानाच्या...

संविधानाच्या माध्यमातून महीलांचे सक्षमीकरण–करण्यासाठी हिंदु कोड बील मंजूर करून त्यांना त्याचे हक्क व अधिकार दिले. आणि अशिक्षीत समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करुन शिक्षणाची दारे खुली केली. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देवून मतदारराजा बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता भारताला संविधान देवून सक्षम लोकशाही बहाल केली. यावेळ पूज्य भिख्कु धम्मशिल थेरो, राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, सुभाष तांगडे, अण्णा भोले, किशोर भोले, शुभम भोले, विजय डोळस, नवनाथ डोळस, विजय सुपेकर, गोरख डोळस, राहुल कांबळे, सुनिल कांबळे, विभीषण जावळे, बंडू घुमरे, सुनिल गायकवाड,प्रमोद गायकवाड यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

## पैठणच्या जायकवाडी...

पान ४ वरून पुढे...

विरोधकांना पटवून, प्रसंगी संभाजीनगर , जालना बीड परभणी, नांदेड जिल्ह्यातील शेतीची व सामान्य माणसाची तहान कशी भागली असती, याची कल्पना करू शकत नाही. केवळ मराठवाडा, विदर्भ नव्हे, तर संपूर्ण राज्याच्या सिंचन क्षमतेचा बारकाईने अभ्यास अन् व्यासंग असणाऱ्या या उत्तुंग नेतृत्वाने महाराष्ट्र आणि दिल्ली गाजविली. त्यांच्या विशेष प्रयत्नातून साकारलेल्या नाथसागर पुढील वर्षी ५० वर्षांच्या सुवर्ण महोत्सवी साजरा करताना शंकररावजींच्या लोककल्याणकारी जीवित कार्याचा पट डोळ्यांसमोर उभा राहतो. कारण की भारताचे तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते १८ ऑक्टोबर १९६५ रोजी जायकवाडी धरणाचा पायाभरणी करण्यात आली होती . २४ फेब्रुवारी १९७६ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जायकवाडी धरण राष्ट्राला समर्पित केले होते. या धरणाला पुढील वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. केंद्र व राज्य शासनाने संयुक्तपणे राज्यातील जलअभ्यासक व तज्ज्ञ अभियंत्यांची समिती नेमून, सन २०२०पासून 'ड्रीप टू' योजनेअंतर्गत राज्यातील ५० वर्षे झालेल्या जुन्या धरणांचे पुनरुज्जीवन सुरू करण्याची मोहीम हाती घेतली आहे त्यात राज्यातील १२ धरणात पैठण या जायकवाडीच्या नाथसागर धरणाचा समावेश आहे. या मोहिमेच्या माध्यमातून धरणाच्या २७ गेटसमोरील सांडव्याला कॉंक्रीट करून मजबुतीकरण होणार असुन धरण भरल्यानंतर गोदावरी नदीपात्रात जलविसर्ग सोडल्यानंतर धरणासमोर पात्रालगत वर आलेल्या खडकाळ भागाचे सपाटीकरण केले जाणार आहे. त्याचे कॉंक्रीटीकरण केल्यामुळे जलविसर्गाला अडथळा न येता पूर नियंत्रणावर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होईल ज्यामुळे जायकवाडी धरणाचे मजबुतीकरण व पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी तज्ज्ञांच्या समितीने सूचना केल्या आहेत. त्यानुसार अहवाल तयार करून नाशिक येथील 'मेरी' संस्थेद्वारे अहवालाची तांत्रिक तपासणी करून जायकवाडीच्या मजबुतीकरणासाठी विविध कामांचा आराखडा व अंदाजपत्रक तयार करून राज्यस्तरीय धरण सर्वेक्षण समितीला सादर करण्यात आले. या प्रस्तावास विभागाने तात्काळ मंजुरी देऊन, ७८ कोटी रुपये निधीस

पान ४ वरून पुढे...

मान्यता देखील मिळाली आहे या निधीचे दोन भाग करण्यात आले असून, पहिल्या टप्प्यात १७ कोटीत मुलभूत सुविधांमध्ये पर्यटकांसाठी विश्रामगृह, रस्ते, परिसराचे सुशोभीकरण, पथदिवे, हिरवळीसह इतर सुविधा उभारण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात ६१ कोटी निधीतून धरणाच्या १० किलोमीटर लांबीच्या सुरक्षा भिंतीची दुरुस्ती करणे, दगडी बांधकाम निखळल्याने त्याचे पुनरुज्जीवन करणे, धरणाचा उत्तर–दक्षिण भिंतीला अद्यावत कुंपणासह सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा देखील भक्कम होणार आहे . अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी पत्रात शेवटी दिली आहे.

## घरास आग...

घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य, धान्य, महत्त्वाचे कागदपत्रे व सोन्याचे दागिने जळुन बेचिराख झाले.विशेष म्हणजे ते अत्यंत गरीब असुन, या अचानक घडलेल्या घटनेने त्या नागरगोजे कुटुंबावर संसार उघड्यावर आला असु त्यांना आर्थिक मदतीची तात्काळ गरज आहे.तरी शासनाने संदिपान नागरगोजे ह्या कुटुंबांना यांच्या घराचा पंचनामा करून, त्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी.अशी मागणी काठेवाडी येथील नागरिकांनी केली आहे.

## लोकप्रतिनिधी आणि...

संगीत खुर्ची आंदोलन करण्यात आले.निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितजी पवार, रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक) रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सादेक सय्यद, कोषाध्यक्ष आप कैलासचंद पालेवाल, प्रसिद्धी प्रमुख रामभाऊ शेरकर आदी सहभागी होते.

पान ४ वरून पुढे...

बीड पंचायत समिती मधील शेतकऱ्यांच्या वाढीव कामांसाठी मंजुरी देण्यात यावी

बीड जिल्ह्यात एकूण ७३५७ कामांवर ८८,७२४ मजूर असून बीड पंचायत समिती अंतर्गत केवळ ५० कामे सुरू असुन त्यावर २१७ मजूर आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातील एकंदरीतच सर्व तालुक्यांमध्ये बीड पंचायत समितीमध्ये कमी कामे सुरू असून शेतकऱ्यांच्या कामांची म ागणी व कामांना मंजुरी देण्यासाठी अधिकारी यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असून यामुळे शेतकऱ्यांची अडवणूक होत आहे. शेतकऱ्यांच्या कामांची मागणी मंजुरी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

४३ डिग्री तापमानात रोहयो कामांवर ८८ हजारांहून अधिक मजुर दाखवणे संशयास्पद असून सखोल चौकशी करून कारवाई करा

बीड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना भ्रष्टाचाराचे कुरण झाले असून नेत्यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी मागच्या सरकारच्या काळात कुशल, अकुशलचे निकष धाब्यावर बसवून थेट मंत्रालयातून मोठ्या मोठ्या प्रमाणावर कामांना मंजुरी देण्यात आली. यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाली .नरेगाच्या अहवालानुसार आज घडीला जिल्ह्यात नरेगाची ७३५७ कामे सुरू असून त्यावर ८८,७२४ मजूर काम करत असल्याचे दाखवले आहे. सध्या बीड जिल्ह्याचे तापमान ४३ अंश असून दिवसेंदिवस उच्चांक पातळी गाठत असताना घराच्या बाहेर पडणं मुश्किल असताना आणि उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन केले जात असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी योजनेवर काम करण्याची वेळ असेल आली असेल तर मजुरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे नरेगाच्या कामावर खरोखरच इतक्या मोठ्या प्रमाणात मजूर आहेत का? ८८ हजार मजुरांचा आकडा नेमका दुष्काळाचा कर आहे की बोगसगिरीचा कहर आहे याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सदगुरु श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मियांचे रक्तदान

## माजलगाव मठाचा आदर्श पायंडा; सामाजिक सलोख्याचे माजलगावात दर्शन

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील प्रसिद्ध श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थान नेहमीच सामाजिक सलोख्याला प्राधान्यक्रम देत आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मीय रक्तदात्यांनी सहभाग घेऊन सामाजिक सलोख्याचा आदर्श पायंडा पाडला आहे. धम र्च्या पलीकडे माणुसकीचे दर्शन घडविले, याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान, मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य म हाराज यांनी सामाजिक सलोखा जपण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे.

माजलगावातील सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये आता आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्याचा निर्णय मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी घेतला. रविवार, दि.२७ एप्रिल रोजी माजलगाव मठात श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी हा संकल्प केला. यामुळे माजलगाव मठामध्ये आता धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपतानाच भाविकांच्या, शिष्यांच्या शरिराच्या आरोग्याची माहिती होण्यासाठी प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात आरोग्य तपासणी केली जाणार आहे.



वीरशैव लिंगायत समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये श्री सद्गुरु मिस्किन स्वामी यांचा जयंती रविवारी विविध धर्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळी आठ वाजता रजत पालखी सोहळा काढण्यात आला. यामध्ये श्री मिस्किन स्वामी यांची चांदीची मूर्ती पालखीमध्ये ठेवून रजत पालखी मठ, देवी मंदिर ते सिंदफणा नदीपर्यंत काढण्यात आली. नदीपात्रात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत चांदीच्या मुर्तीला जलाभिषेक घालण्यात आला. पालखीत सहभागी महिलांनी नदीतील जल कलशात घेऊन रजत पालखी नदीपात्र ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान मंदिर मार्गे माजलगावकर मठात रजत पालखीचा समारोप झाला. यानंतर नदीपात्रातील जलाने श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या समाधीस लघुरुद्राभिषक घालण्यात आला. यानंतर श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशीवर्चन लाभले. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या जन्म ोत्सवानिमित्त यंदा माजलगावकर म ठात रक्तदान व नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले. शेवटी भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास माजलगावसह बीड, गेवराई, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी जयंती उत्सवासाठी माजलगाव येथील वीरशैव समाज तसेच युवकांनी मोठे परिश्रम घेतले.

### ● ४९ जणांचे रक्तदान तर १४० जणांची नेत्र तपासणी

धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने यंदा श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतून जयंती उत्सवानिमित्त माजलगावकर मठात प्रथमच रक्तदान शिबिर व नेत्रतपासणी करण्यात आली. माजलगाव मठ संस्थान आणि माजलगाव ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले तर आनंदऋषी हॉस्पिटल आणि मठाच्या वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिराचा १४० जणांनी लाभ घेतला. यातील ५० नागरिकांमध्ये डोळ्यांचे दोष आढळून आले. त्यांच्यावर आठ दिवसात आनंदऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे मोफत ऑपरेशन व उपचार केले जाणार आहेत.

### ● 'मठातर्फे वर्षभर आरोग्य शिबिरे घेणार'

आरोग्य हा विषय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. माजलगाव मठातर्फे भविष्यकाळात आरोग्य विषयक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. वर्षभर आरोग्य शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यावर मठाचा भर असेल, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

**नाव नोंदणी करण्याचे आवाहन: भिक्खु धम्मशिल थेरो**

**बीड । प्रतिनिधी**

तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित



शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पालकांनी आपल्या १५ वर्षावरील मुलांचे नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### नाव नोंदणीसाठी संपर्क

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत खोलेश्वर विद्यालय ची विद्यार्थिनी भावना साबळे चे यश

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत खोलेश्वर विद्यालय च्या ६२ विद्यार्थ्यांनी पात्र ठरत यश मिळवले आहे. इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी भावना भागवत साबळे हि शिष्यवृत्तीस पात्र ठरली असुन तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील खोलेश्वर विद्यालयात इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार भागवत साबळे यांची मुलगी भावना साबळे सह खोलेश्वर विद्यालया चे ६२ विद्यार्थी पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून पुढील शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, विलास पारेकर, प्राचार्या सरिता फपाळ, रोहिणी पारेकर, मुख्याध्यापक संजय रायतेसर, पालकवर्गासह परिसरातून कौतुक होत आहे.



# डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ अँड. मनोज संकाये यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन

**पाण्याचा वापर काटकसरीने करावा**

**परळी । प्रतिनिधी**

शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या शुभहस्ते संपन्न यावेळी सारड गावचे माजी सरपंच आघाव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या



पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात. पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना अँड.मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे.

यावेळी मंगलवार मल्टीस्टेट बँकेचे शाखा अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी , शिवा बडे, बालासाहेब चाटे,प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बीड इंडियन डेन्टल असोसिएशनचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

इंडियन डेन्टल असोसिएशन, शाखा बीड, तर्फे स्पंदन-२०२५ या सांस्कृतिक महोत्सवाचे बीड येथे आयोजन दि. २० एप्रिल २०२५ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ.नरेंद्र काळे (अध्यक्ष, एम.एस.डी.सी.) व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनंत मुळे (अध्यक्ष, आय.एम.ए. बीड) व डॉ. हिमांशू श्रीवास्तव (डीन, ए.डी.सी.एच. बीड), तसेच आय. डी.ए. संघटनेचे बीड शाखेचे अध्यक्ष डॉ.उम ाशंकर विश्वेकर, सचिव डॉ. विजयालक्ष्मी बायस, खजिनदार डॉ. मंगेश अंधारे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाची सुरूवात धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे




सूत्रसंचालन व परीक्षण डॉ. उज्वला वनवे यांनी केले. गणेश वंदन- डॉ. सुधीर साळवे, डॉ.गणेश कांबळे, डॉ.गणेश फुंदे व वैभव उदार यांनी केले तसेच सितार वादन डॉ. तुषार श्रृंगारपुरे यांनी केले. त्यानंतर गायन आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

गायन स्पर्धेमध्ये डॉ.राजु खामकर, डॉ.मंगेश अंधारे, डॉ.उमाशंकर विश्वेकर, डॉ.सुधीर साळवे, डॉ.गणेश कांबळे, डॉ.रेणुकादास जिंतुरकर व सौ.स्नेहलता जिंतुरकर, डॉ.गणेश फुंदे, डॉ.विशाखा फ ुंदे, डॉ.किरण सोनसळे, डॉ.जयसिंग रसाळ, डॉ.सुजाता जयेश विश्वेकर व वैभव उदार यांचा सहभाग होता. नृत्य स्पर्धेमध्ये डॉ. ऋतुजा ढाकणे, डॉ. शारदा कुलकर्णी, डॉ. रेशमा साळवे, डॉ. शितल सोनसळे, डॉ. विजयालक्ष्मी बायस, डॉ. किर्ती ठाकुर, डॉ. प्राची सांगवीकर, श्रीया खामकर, दुर्वा खामकर, वृंदा सानप, प्रज्वली लिंबगावकर आणि क्रिशा काकडे यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता डॉ. आर.बी. जिंतुरकर आणि डॉ. टी. एच. श्रृंगारपुरे यांच्या काव्यवाचनाने झाली.

नृत्य स्पर्धेमध्ये सोलो परफॉर्मन्ससाठी डॉ. ऋतुजा ढाकणे यांना प्रथम पारितोषिक तर डॉ. किर्ती ठाकुर यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. त्यानंतर समुह नृत्य स्पर्धेमध्ये डॉ. शारदा कुलकर्णी आणि डॉ. रेशमा साळवे यांना प्रथम पारितोषिक तर डॉ. विजयालक्ष्मी बायस आणि डॉ. शितल सोनसळे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले.

# भालचंद्र विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि.२८एप्रिल २०२५ रोजी भालचंद्र विद्यालयात शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेले विद्यार्थी १) चि.वरद आप्पराव मूळे २) कु भक्ती दत्तात्रय आर्सुळ पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा तसेच १) कु रिद्दी गणपत जाधव २) कु कल्पना किसन पार्की पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा चि.यश घरत एन एम एम एस परीक्षा तसेच पालकांचा सत्कार संस्थेचे सचिव श्री दिपक दादा घुमरे यांच्या हस्ते संपन्न झाला या प्रसंगी गुणवंत विद्यार्थी व पालक,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते या प्रसंगी श्री दीपक दादा म्हणाले की



भावी आयुष्यात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देताना या परीक्षेचा फायदा होणार आहे यु पी एस सी, एम पी एस सी मधून अधिकारी होतील तसेच स्कॉलरशिप, एन एम एम एस परीक्षा पास होण्यासाठी काय केले पाहिजे याची माहिती सर्व दिली कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सावंत के बी हे होते श्री हावळे ए एम यांनी सूत्रसंचालन केले व श्री आजबे जी व्हि.यांनी आभार मानले.


## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.- ०५/२०२५**

**संतोष पि. किशन चौरे विरुध्द का पंचायत कार्यालय,खंडाळा**

पहा

१. संतोष पि. किशन चौरे, रा. खंडाळा ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून

जन्म धारक- संचिता संतोष चौरे यांचा दिनांक १६/११/२००७ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय खंडाळा ता.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय खंडाळा ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३ /०४/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०५/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

### मा. श्री ओ. एन. मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज ७०६/२०२५**

**व्यकटेश पि. सुधाकर शहाणे विरूध्द निरंक**

अर्जदार - १. व्यकटेश पि. सुधाकर शहाणे, वय ४६ वर्षे, धंदा व्यापार रा. अथर्व पॅलेस, अथर्व अभ्यासिका जवळ, नवगण कॉलेज रोड, बीड, ता.जि. बीड.

विरुध्द निरंक

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुधाकर पि. मनोहरराव शहाणे, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत सुधाकर पि. मनोहरराव शहाणे, यांचा मृत्यु दिनांक २४/०३/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत सुधाकर पि. मनोहरराव शहाणे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सुधाकर पि. मनोहरराव शहाणे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०६/२०२५ आहे.

(मार्फत- ॲड. शिंदे)

आदेशावरून.

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. व्ही. सी. जोशी ७ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६९४/२०२५**

**अभिमान विठठल धनवे वि.निरंक**

ज्यापेक्षा विठठल उमाजी धन्वे हे दिनांक १५.१०.२०१० रोजी कळसंबर, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ अभिमान पि. विठठल धन्वे वय - ७० वर्षे, धंदा शेती, रा. कळसंबर ता. जि. बीड. २. कबई भ्र. आत्माराम बनसोडे वय - ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. भोनगिरि ता. भुम जि. धाराशिव ३. कौसल्या भ्र. गुनाजी वाघमारे वय - ७२ वर्षे, धंदा घरकाम. रा. गोंदी ता. अंबड जि.जालना, ४. राधाबाई भ्र. अंकुश धनवे वय - ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. कळसंबर ता. जि.बीड संभाजी नगर ह.मु. ५. सखारामपंत नगर, गंगापुर, ता. गंगापुर जि. महादेव पि. अकुंश धनवे वय - ४४ वर्षे, धंदा मजुरी, रा. कळंसबर ता. जि. बीडह.मु.. भोनगिरि ता. भुम जि.धाराशिव

अर्जदार नं १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार नं. २ व ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार नं ४ ही मयत यांची सुन आहे ( मयत मुलगा अंकुश याची पत्नी) असून अर्जदार नं ५ हा मयताचा नातु ( मयत मुलगा अंकुश याचा मुलगा ) या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की,, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत विठ्ठल उमाजी धन्वे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २४/०६/ २०२५ आहे.

आज दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

(ॲड. गायकवाड बी. के. यांच्या मार्फत)

आदेशावरून.

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.२९ एप्रील २०२५ पान ४



भारतीय खो खो संघाची कर्णधार बीड जिल्ह्याची सुकन्या यांना रोटरी क्लब ऑफ बीड चा चंपावती रत्न पुरस्कार प्रदान

# शिवसेना जिल्हाप्रमुख पद परमेश्वर सातपुते यांच्याकडेच द्या : शिवसैनिकांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पद असतांना जिल्ह्यात शिवसेनेचे वातावरण निर्माण करण्याचे काम इतर कोणत्याही जिल्हाप्रमुख किंवा पदाधिकारी यांना जमले नाही मात्र परमेश्वर सातपुते यांनी जबाबदारी घेतल्यानंतर जिल्ह्यात (उबाठा) गटाची विविध आंदोलन मोर्चाच्या माध्यमातून चर्चा होऊ लागली शिवसैनिकांना सोबत घेऊन आणि शिवसैनिकांच्या मदतीला धावून जाणारा जिल्हाप्रमुख म्हणून परमेश्वर सातपुते यांची ओळख निर्माण झाली होती, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरण्यासाठी प्रशासनाच्या दारात आंदोलन करून जाब विचारण्याची हिंमत या जिल्हाप्रमुखाने करून दाखवली असल्याने आता पुन्हा गरज याच जिल्हाप्रमुखाची असल्याचे शिवसैनिक बोलत आहेत.

जिल्हाप्रमुख पदाला खरा शोभणारा खमक्या जिल्हाप्रमुख म्हणून परमेश्वर सातपुते यांची चर्चा होत आहे, स्वतः शेतकरी कुटूंबातील असल्याने शेतकऱ्यांचे असणारे प्रश्न, सामान्य जनतेचे प्रश्न, तळागाळातील शिवसैनिकांच्या अडीअडचणी जाणून घेणारे नेतृत्व म्हणून परमेश्वर सातपुते



**जुन्या नव्या तळागाळातील शिवसैनिकाला सोबत घेऊन जाणारा नेता म्हणजे परमेश्वर सातपुते सर यांची जिल्ह्यात ओळख आहे.**

नावाजले गेले आहेत, सरकारच्या विरोधात परखडपणे आवाज उठवणारे आणि शेतकरी वर्गासाठी कर्जमुक्ती सारखा प्रश्न असो की शेतीमालाच्या भावाचा प्रश्न असो अगदी अभ्यासपूर्ण मांडण्याचे काम करून शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे या भूमिका ठामपणे मांडून शेतकऱ्यांना दिलासा देणारा प्रश्न शासनदरबारी मांडला, तरुण तडफदार असणारे हे नेतृत्व पक्षाने काही दिवसांपासून पदावरून दूर ठेवले असल्याने शिवसेनेचे आंदोलन मोर्चा आणि चर्चाच बंद झाल्या म्हटले तरी वावगे ठरणार नाही, अश्या या खमक्या नेतृत्वाला पुन्हा संधी पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी द्यावी अशी मागणी जिल्हाभरातील शिवसैनिकांच्या वतीने होत आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी सेल्फ सर्व्हे करून घ्या

## आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



**•अडचण असल्यास संपर्क साधावा**

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही ▶▶ उर्वरित पान २ वर

# तहसीलदारांचा पुढाकार आणि आजींना मिळाले अनुदान

**बीड । प्रतिनिधी**

डीबीटीची प्रक्रिया उशिरा केल्याने कुमशीच्या केशरबाई मंचारे या ८० वर्षीय आजीना अनुदान मिळत नव्हते . या आजी तहसील कार्यालयात येरझऱ्या मारत होत्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आजींकडे पाहिले आणि त्यांना कामाबाबत विचारणा केली.

डीबीटी प्रक्रिया उशिरा झाल्याने आजींचे अनुदान मिळाले नव्हते . तात्काळ तहसीलदार शेळके यांनी सीएससी सेंटर चालकास सूचना देत आजींची डीबीटी प्रक्रिया तातडीने करून



घेण्याचे आदेश दिले . त्यानुसार केंद्र संचालक सतीश जाधव यांनी सर्व प्रक्रिया केली . आजींच्या खात्यावरील दहा हजार रुपये रोख रक्कम काढून आणण्यात आली . ही रक्कम तहसीलदारांच्या हस्ते आजींना सुपूर्द करण्यात आली . त्यामुळे आजींनी सर्वांचे आभार मानले.

# वडवणीचा बाजार मंगळवारी भरणार !

## बुधवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक

**वडवणी । प्रतिनिधी**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने बुधवार ३० एप्रिल रोजी भव्य मिरवणूक निघणार असल्याने बुधवार ऐवजी एक दिवस अगोदर म्हणजेच मंगळवारी हा आठवडी बाजार भरवला जाणार असल्याची माहिती जयंती उत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे तरी तालुक्यातील सर्व व्यापारी बाजारकरु बांधवांनी मंगळवारी रोजी बाजारासाठी यावे असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी शहराचा आठवडी बाजार हा प्रत्येक बुधवारी भरवला जातो. येत्या ३० एप्रिल बुधवार रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक शहरातून काढली जाणार आहे.त्यामुळे बुधवारी भरणारा आठवडी बाजार एक दिवस अगोदर म्हणजेच मंगळवारी भरवला जाणारआहे. दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक ही बीड परळी हायवे रोडवरील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकापासून सुरू केली जाणार आहे. हायवे रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ही मिरवणूक संविधान चौक, वसंतराव नाईक चौक मार्गे निघून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये या मिरवणुकीची सांगता केली जाणार आहे. बुधवारी ही मिरवणूक असल्याने बाजार करु नागरिक व व्यापारी बांधवांना त्रास होऊ नये म्हणून एक दिवस अगोदर म्हणजेच मंगळवारी हा आठवडी बाजार भरवला जाणार आहे. तालुक्यातील तमाम नागरिक व व्यापारी बांधवांनी याची दक्षता घ्यावी असे आवाहन देखील जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांना लोकशाही बहाल केली: पप्पू कागदे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारून शोषत, पिडीत उपेक्षीत समाज बांधवांना मुख्य प्रकलत आणण्यासाठी त्याचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून प्रत्येकांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला. हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून उपेक्षीतांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला देवून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा रिपाइं



प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी, शिवणी, खांडवी, सांडरवण, घाटजवळा, आहेर वडगांव या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय

▶▶ उर्वरित पान २ वर

# पैठणच्या जायकवाडी धरणाचे पुनरुज्जीवन होणार : जे.डी.शाह

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरलेल्या नाथसागराचे भगिरथ दिवंगत माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून साकारलेल्या नाथसागर या जायकवाडी धरण निर्मितीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने केंद्र शासन व राज्य शासनाने 'ड्रीप टू' योजनेअंतर्गत धरणाचे पुनरुज्जीवन हाती घेतले आहे. कामासाठी ७८ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्यक्ष कामास सुरुवात देखील करण्यात आली आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली



आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की पैठणचा जायकवाडी प्रकल्प होऊ नये म्हणून विरोधक एकवटले होते. परंतु, कणखर बाण्याचे कै. शंकरराव चव्हाण यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# घरास आग लागुन संसार उपयोगी साहित्य जळून खाक

**धारुर । प्रतिनिधी**

काटेवाडी येथील घरास अचानक मध्ये आग लागल्याने घरातील संसारोपयोगी साहित्यासह महत्त्वाचे कागदपत्रे व सोने जळुन खाक झाल्याची घटना घडली.सदरील ते गरीब असुन, त्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी.अशी मागणी काठेवाडी चेउपसरपंच माणिक दादा मुंडे यांनी व काठेवाडीच्या नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात नागरगोजे भोगलवाडी काटेवाडी ता.धारूर येथील या नागरगोजे कुटुंबाच्या घरास दुपारच्या वेळी १२.३० दि.२५.०४.२०२५ रोजी अचानक घरात आग लागली ते विजवण्यासाठी नागरिक धावपळ करत होते पण आग जास्त असल्याने नागरिकांनी जाऊस्तरच जळुन खाक झालं अचानक आग लागून घरास आग लागली.या आगीत ▶▶ उर्वरित पान २ वर




# लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या वादात बीड पंचायत समितीतील शेतकऱ्यांची कामे खोळंबली

## कार्यालयात खुर्चीवर उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी संगीत खुर्ची आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड पंचायत समितीत लोकप्रतिनिधी आणि आधिका-यांच्या अंतर्गत वादात घरकुल,फळबागा,गायगोठा, शेवगा लागवड,खडीकरण, पाणंद रस्ते आदी कामांची मागणी, मंजुरी तसेच मस्टर काढणे बंद, बिले काढण्यात येत नाहीत त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. गटविकास अधिकारी कार्यालयात खुर्चीवर हजर रहात नसल्याने



आणि दर सहा महिन्यांनी अधिकारी बदलत असल्याने बीड पंचायत समितीमध्ये संगीत खुर्चीचा खेळ रंगला असुन यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी बीड पंचायत समिती आवारात लक्ष्यवेधी ▶▶ उर्वरित पान २ वर